आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१३ जानेवारी २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारीला मतदान, मतमोजणी ७ फेब्रुवारीला

- महानगरपालिका निवडणुकांसाठीचा प्रचार संपला, मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी सर्व राजकीय पक्षांचे जोरदार प्रयत्न

- मुंबईच्या महापौराच्या संदर्भात जात-धर्माचे उल्लेख झाल्याप्रकरणी पुरावे मिळाल्यावर कारवाई करु, अशी राज्य निवडणूक आयोगाची भूमिका

**आणि**

- दहा मिनिटांत वस्तू घरपोच देण्याची सुविधा बहुतांश डिलिव्हरी कंपन्या लवकरच बंद करणार

**<><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत केली. यामध्ये पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, धाराशिव, लातूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदांच्या आणि त्या जिल्ह्यातल्या पंचायत समितीच्या निवडणुका आयोगाने आज जाहीर केल्या.

***होल्ड बाइट वाघमारे १***

या निवडणुकांसाठी १६ जानेवारी पासून अर्ज भरायला सुरुवात होईल आणि २१ जानेवारीपर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरता येतील. २२ जानेवारीला अर्जांची छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. याच दिवशी

अंतिम उमेदवारांची यादी जाहीर होईल आणि मतदान चिन्ह वाटप होईल. ३ तारखेला मध्यरात्रीपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येईल आणि ५ फेब्रुवारीला सकाळी साडे ७ ते साडे ५ दरम्यान मतदान होईल. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषदेसाठी १ आणि पंचायत समितीच्या गणासाठी एक अशी दोन मतं द्यावी लागतील. या निवडणुकीतल्या प्रचार खर्चाविषयी राज्य निवडणूूक आयुक्त म्हणाले…

***होल्ड बाइट वाघमारे २***

या निवडणुकीत EVMचा वापर होणार असून विधानसभेच्या मतदार यादीत १ जुलै २०२५ रोजी नाव असलेल्या मतदारांना या निवडणुकीत मतदान करता येईल. ‘मताधिकार’ या मोबाइल ॲपवरुन मतदारांना त्यांचं नाव मतदार यादीत शोधता येईल.

या निवडणुकांमध्ये २ कोटी ९ लाख मतदार असतील आणि त्यांच्यासाठी २५ हजार ४८२ मतदान केंद्र कार्यरत असतील. यासाठी १ लाख २८ हजार अधिकारी आणि कर्मचारी काम करतील, असं निवडणूक आयोगाने सांगितलं.

**<><><><>**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकांसाठीच्या प्रचाराच्या तोफा आज थंडावल्या. एकंदर २९ महापालिकांमधल्या ८९३ प्रभागांमधल्या २ हजार ८६९ नगरसेवकांसाठी परवा मतदान होणार आहे. यासाठी एकूण १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत. सकाळी साडे ७ ते साडे ५ वाजेदरम्यान हे मतदान होणार आहे.

**प्रचाराचा** अखेरचा दिवस असल्यानं सर्व राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नागपुरात रोड शो केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत, तर अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये रोड शो केला. राज ठाकरे यांनीही आज पुण्यात प्रचार केला. शिवसेनेच्या नेत्या

आणि विधानपरिषदेच्या उपसभापती डॉक्टर निलम गोऱ्हे यांनी आज पुण्यात वार्ताहर परिषद घेऊन निवडणूक प्रक्रियेतल्या अनियमिततेवर ताशेरे ओढले.

**ठाणे** जिल्ह्यातल्या ठाणे, कल्याण डोंबिवली, नवी मुंबई, उल्हासनगर, मिरा भाईंदर, आणि भिवंडी निजामपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी विविध पक्षाच्या उमेदवारांनी प्रचारफेऱ्या काढल्या. तसंच ठाणे पोलिसांनी पथसंचलन करत नागरिकांना निर्भयपणे मतदान करण्याचं आवाहन केलं.

**जालना** महानगरपालिकेत उमेदवारांनी प्रचारफेऱ्या काढल्या तसंच मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या.

**सांगली** महानगरपालिकेत भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांनी पदयात्रा काढली.

**चंद्रपूर** महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी आज काँग्रेसने विविध प्रभागात रोड शो केले. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपावर जोरदार टीकास्त्र सोडलं.

**<><><><>**

मुंबईच्या महापौराच्या संदर्भात जात-धर्माचे उल्लेख मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह विविध राजकीय पक्षांनी केले आहेत. याप्रकरणी पुरावे मिळाल्यावर संबंधितांना नोटिस पाठवू, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज दिली. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या विरोधातल्या तक्रारीप्रकरणी महापालिका आयुक्तांकडून अतिरिक्त व्हिडीओ मागवले आहेत. तसंच निवडणूक निरीक्षक इक्बाल सिंह चहल यांच्याकडून अहवाल मागवला आहेत, असं त्यांनी सांगितलं.

या निवडणुकीत आचारसंहिता भंगाच्या ३४१ तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यापैकी २८० तक्रारींवर कारवाई पूर्ण झाल्याचं वाघमारे म्हणाले.

**<><><><>**

राज्यात महापालिका निवडणुका होत आहेत. या अनुषंगानं प्रत्येक सजग आणि सुजाण नागरिकानं येत्या १५ तारखेला आपला मतदानाचा हक्क बजावावा आणि योग्य मतदाराला निवडून द्यावं, असं आवाहन अभिनेता सारंग साठे यांनी केलं आहे.

**होल्ड बाईट साठे (२९ सेकंद)**

<><><><><>

नाशिक महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपानं ७५ जणांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. निवडणुकीत पक्षाशी बंडखोरी करून निवडणूक लढवणाऱ्या तसचं उमेदवारी न मिळाल्यानं अन्य पक्षाकडून उमेदवारी मिळवून निवडणूक रिंगणात असलेल्यांचा यात समावेश आहे. यात नाशिक महापालिकेचे माजी सभागृह नेते कमलेश बोडके, सतीश सोनवणे यांच्यासह काही माजी नगरसेवकांचा समावेश आहे.

<><><><><>

१० मिनिटात वस्तू घरपोच देण्याची सुविधा बंद बहुतांश कंपन्या लवकरच बंद करणार आहेत. यामुळं या वस्तू घरपोच पोहोचवणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेची निश्चिती होईल आणि त्यांना कामासाठी पोषक वातावरण मिळेल. यासंदर्भात Blinkit, Zepto, Zomato आणि Swiggy यासारख्या कंपन्यांच्या प्रतिनिधींची सरकारनं बैठक घेतली होती आणि जलद वस्तू पोहोचवण्याच्या संदर्भात काळजी व्यक्त केली होती. Blinkit नं त्यांच्या जाहिरातींमधून १० मिनिटात डिलिव्हरीचं आश्वासन काढून टाकलं आहे. येत्या काही दिवसात इतरही कंपन्या याची अंमलबजावणी करण्याची शक्यता आहे.

<><><><><>

पीएफआरडीए अर्थात निवृत्तीवेतन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणानं NPS अर्थात राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेच्या खात्यातून काढता

येणाऱ्या रकमेसंदर्भात मार्गदर्शक तत्वं आणि नियम तयार करण्यासाठी एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. ही कार्यवाही पीएफआरडीएच्या कायद्यातल्या तरतुदींशी सुसंगत असल्याचं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे. या उपक्रमाचा उद्देश ग्राहकांचं निवृत्तीवेतन अधिक सुरक्षित करणं हा आहे. या १५ सदस्यीय समितीच्या अध्यक्षपदावर इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडियाचे माजी अध्यक्ष डॉ. एम. एस. साहू असतील. या समितीत विधी, वित्त, विमा, भांडवली बाजार आणि शिक्षण यांच्यासह विविध क्षेत्रातल्या तज्ज्ञांचा समावेश आहे.

**<><><><>**

भटक्या कुत्र्यांनी चावा घेतलेल्या व्यक्तींना मोठी नुकसान भरपाई द्यायला लावू असा इशारा सर्वोच्च न्यायालयानं राज्य सरकारांना दिला आहे. गेल्या ५ वर्षांत भटक्या प्राण्यांच्या संदर्भात दिलेल्या दिशानिर्देशांची योग्य अंमलबजावणी झाली नसल्याबद्दल न्यायालयानं नाराजी व्यक्त केली. या प्रकाराबद्दल प्राणीप्रेमी आणि त्यांना खाऊ घालणाऱ्यांना जबाबदार धरलं पाहिजे असं मत न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठानं नोंदवलं. भटक्या कुत्र्यांना सार्वजनिक ठिकाणी खाऊ घालणारे नागरिक आणि संस्थांवर सर्वोच्च न्यायालयानं ताशेरे ओढले. त्यांची करुणा ही प्राण्यांपर्यंतच मर्यादित का आहे, माणसांपर्यंत ती का पोहोचत नाहीत, असा प्रश्न न्यायालयानं विचारला.

**<><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज नवी मुंबईत डी वाय पाटील स्टेडियमवर मुंबई इंडियन्सचा सामना गुजरात जायंट्सबरोबर होत आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**//<><><><>//**